# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date: 03 October 2023
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi

**आकाशवाणी औरंगाबाद**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक : ०३ ऑक्टोबर २०२३ दुपारी १.०० वा.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज छत्तीसगड आणि तेलंगणच्या दौऱ्यावर आहेत. छत्तीसगडमधल्या जगदलपूर इथं २६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या विविध विकासकामांचं लोकार्पण आणि पायाभरणी त्यांच्या हस्ते करण्यात आली. तेलंगणात निझामाबाद इथं सुमारे आठ कोटी रुपयांच्या विकासकामांची पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

****

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखील पथक आजपासून पुढील तीन दिवस तेलंगणात निवडणूक तयारीचा आढावा घेणार आहे. या पथकाचे सदस्य आज दुपारी विविध राजकीय पक्षांसोबत तसंच निवडणूक संबंधित यंत्रणांसोबत बैठक घेणार आहेत. निवडणूक प्रक्रियेत मतदानाचा टक्का वाढावा, आणि नागरिकांमध्ये निवडणूकीसंदर्भात जागरुकता निर्माण व्हावी, या उद्देशानं आयोजित प्रदर्शनाला ही ते भेट देतील तसंच तरुण मतदारांसोबत संवाद साधतील. तेलंगणामध्ये या वर्षाच्या अखेरीस विधानसभा निवडणुका होणार आहेत.

****

नांदेड इथल्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात २४ रुग्णांचा मृत्यू झाल्याप्रकरणी विरोधकांनी सरकारला जबाबदार धरलं आहे. याप्रकरणी मुख्यमंत्र्यांसह आरोग्य मंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा देण्याची मागणी, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. या रुग्णालयात कालपासून आणखी सात रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली असून, औषधांच्या तुटवड्यामुळे हे मृत्यू होत असल्याचं वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही या मुद्यावरुन सरकारवर टीका केली आहे.

✻✻✻✻

इतर मागासवर्ग – ओबीसी सर्वेक्षणासंदर्भात राज्य सरकार सकारात्मक असल्याचं, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. बिहारमध्ये झालेल्या जातीनिहाय जनगणनेविषयी विचारलं असता, फडणवीस यांनी, या अहवालाची अचूकता तपासून पाहिली जाईल त्यांनतर सर्वेक्षणाची कार्यपद्धती कोणती असावी याबद्दल ठरवलं जाईल, असं सांगितलं.

✻✻✻✻

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये, ही सर्व नेत्यांची भुमिका असल्याचं, राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. ते काल नाशिक इथं माध्यमांशी बोलत होते. यासंदर्भात आपल्यावर होणारी टीका अनाठायी असल्याचं ते म्हणाले. ओबीसी आरक्षणात मर्यादा आहेत, त्यामुळे ओबीसी समाजाचं आरक्षण कायम ठेवून अन्य शिल्लक आरक्षणातून मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात सरकार प्रयत्नशील असल्याचं भुजबळ यांनी सांगितलं.

✻✻✻✻

सरकारच्या प्रत्येक कल्याणकारी योजनेची जनजागृती घराघरापर्यंत करावी, असं आवाहन भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी कार्यकर्त्यांना केलं आहे. धाराशिव जिल्ह्यात भूम तालुक्यातल्या माणकेश्वर इथं सेवासप्ताहाअंतर्गत रक्तदान शिबिर, आरोग्य सुरक्षा कवच कार्ड वाटप, विकास कामाचं उद्घाटन काल ठाकूर यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. केंद्र सरकार सामान्य माणसांना केंद्रबिंदू ठेवून काम करत असून, आगामी काळात पुन्हा भाजपचंच सरकार येणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

✻✻✻✻

गोदावरी नदीचं प्रदूषण टाळण्यासाठी तसंच २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यापर्यंत प्लास्टिक मुक्त गोदावरीचा संकल्प करण्यात आला असून, त्याअंतर्गत नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं कालपासून अविरल गोदावरी अभियानाला प्रारंभ झाला. स्वच्छता ही सेवा अभियान आणि महात्मा गांधी जयंतीचं औचित्य साधून नाशिक शहरातल्या रामकुंड इथं अध्यात्मिक गुरु श्री.एम यांच्या उपस्थित या अभियानाची सुरुवात झाली.

✻✻✻✻

चीन मध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रिडा स्पर्धेत आज, नौकानयन मध्ये पुरूषांच्या कैनोइंग डबल एक हजार मीटर स्पर्धेत भारताच्या अर्जुन सिंह आणि सुनील सिंह या जोडीनं कांस्य पदक जिंकलं. भारतीय पुरुष क्रिकेट संघानं आज नेपाळचा २३ धावांनी पराभव करत उपान्त्य फेरीत प्रवेश केला आहे. धनुर्विद्या मध्ये ज्योती सुरेखा वेन्नम हिनं अदिती गोपिचंदचा पराभव करत अंतिम फेरी गाठली आहे. भारतानं या स्पर्धेत आत्तापर्यंत १३ सुवर्ण पदकांसह ६१ पदकं मिळवत पदकतालिकेतलं आपलं चौथं स्थान कायम ठेवलं आहे.

****

क्रिकेट विश्वचषक स्पर्धेपूर्वी सराव सामने खेळले जात आहेत. भारताचा आज दुसरा सराव सामना नेंदरलँडसोबत तिरुवनंतपुरम् होणार आहे. भारताचा इंग्लंडसोबतचा पहिला सराव सामना पावसामुळे रद्द झाला होता.

****

राज्यात एक जून पासून आतापर्यंत सरासरीच्या ९१ टक्के पाऊस पडला आहे. हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, जून महिन्यात ५३ टक्के, जुलै मध्ये १३८ टक्के, ऑगस्टमध्ये ३८ टक्के, सप्टेंबर मध्ये १२८ टक्के पाऊस झाला आहे.

****